# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई – ४०० ०२२.

**क्रमांक : मप्रनि/ सस (तां)/ म-** 420

**दिनांक :** 2/११.१०.**२०१५.**

**प्रति,**
**संचालक,**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
१५ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२.

विषय : कुसुंबा, ता.जि.धुळे येथील बाजार ओटयास बांधकाम पर्यावरण विभागाची परवानगी न घेतल्याबाबत.....

संदर्भ : मा.मंत्री, पर्यावरण यांच्या कार्यालयाकडून मंडळास प्राप्त झालेली तक्रार क्र.७६६, दि.१७.०६.२०१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, धुळे यांनी दि.१६.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर घटनेबाबत सद्यस्थितीदर्शक अहवाल मुख्यालयास सादर केला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

सदर अहवालानुसार, मौजे कुसुंबा गांवातील नव्याने बांधण्यात आलेल्या बाजार ओटयास केंद्र शासनाची पर्यावरण अनुमती व म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र घेणे आवश्यक नाही, असे या कार्यालयाचे मत आहे.

आपल्या माहितीसाठी.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

(पु.कि.मिराशे) 
30/10/15

**(पुं.कि.मिराशे)**
सहा.सचिव (तां.)

**प्रत माहितीसाठी,**
**स्वीय सहायक,** मा.मंत्री, पर्यावरण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

E:\D Drive\My document\HQ\AS(T)1.doc

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक कार्यालय,
दुसरा मजला, फुलचंद प्लाझा,
धुळे-४२४००१
फोन नं. ०२५६३-२७३७३१.

---

जा.क्र.मप्रनिमं/उप्राधु/ ८८२ /२०१५ दिनांक:- १६/१०/२०१५

M. P. C. BOARD
Inward Section
15102३FT0145
Sion, Mumbai-22.

प्रति,
**प्रादेशिक अधिकारी,**
**म. प्र. नि. मंडळ,**
**नाशिक.**

**विषय:** - कुसुंबा ता. जि. धुळे येथील बाजार ओटयास बांधकाम पर्यावरण विभागाची परवानगी न घेतल्याबाबत......

**संदर्भ:** - १. या कार्यालयास म. प्र. नि. मंडळ मुख्याल यांच्या कडुन प्राप्त झालेली तक्रार दि. २१/०९/२०१५.
२. दि. १२/१०/२०१५ रोजी कुसुंबा गावातील बाजारपेठेस दिलेली भेट.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयासअनुसरुन सादर करण्यात येते की, श्री. संग्राम गोविंदराव पाटील व श्री. संजय साहेबराव शिंदे ग्रामपंचायत सदस्य कुसुंबा ता.जि. धुळे यांचे कडुन मा. ना. श्री. रामदासजी कदम, मंत्री पर्यावरण, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांना सादर करण्यात आलेली व ई-मेल व्दारे दि. २१/०९/२०१५ रोजी मुख्यालय म.प्र.नि. मुंबई यांच्या कडुन प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १२/१०/२०१५ रोजी मौजे कुसुंबा गावातील नव्याने बांधण्यात आलेल्या बाजार ओटयास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान ग्रामपंचायत कुसुंबाचे श्री. विलास शिंदे उपस्थित होते. सदर पाहणी मधे ग्रामपंचायत कार्यालयाने २५ फुट X १२ फुट X 2.5 फुट (उंची) या आकाराचे ११ ओटे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले. सदर ओटयाचे एकुण क्षेत्रफळ ३०७ चौ. मी. असल्याचे आढळले. सदर ओटा बांधकामास पर्यावरणीय अनुमतीची (Environmental Clearence) आवश्यकता नाही असे वाटते.

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

**(सं. दे. पाटील )**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, धुळे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
सहाय्यक सचिव (तांत्रिक), मप्रनि मंडळ, मुख्यालय,मुंबई.
मुख्य नस्ती - २०१५.

मा. क्र. मंत्री. पर्यावरण/जनरल/७६६/२०१५ तक्रार - अर्ज
२०/८/१५

दि. ११/६/२०१५

प्रति,
मा. श्री. ना. रामदास गंगाराम कदम.
मंत्री पर्यावरण मंत्रालय. ४ था मजला
महाराष्ट्र राज्य मुंबई - 32.

M. P. C. BOARD
Inward Section
150825F10150
Sion, Mumbai-22.

अर्जदार :- श्री. संग्राम गोविंदराव पाटील
श्री. संजय साहेबराव शिंदे (ग्रां.पं. सदस्य)
मु. पो. कुसुंबा ता. जि. धुळे

मंत्री पर्यावरण यांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
प्राप्त दिनांक १७/६/१५
आवक क्रमांक ७६६
लिपिक खा.स./स्वी.स.

विषय :- महाराष्ट्र राज्य स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प पुणे अंतर्गत, धुळे जिल्ह्यातील कुसुंबा ता. जि. धुळे येथील बाजारओटा बांधकाम पर्यावरण विभागाची परवानगी न घेतल्या बाबत :-

मा. सहसचिव
म.प्र.नि.मं. यांनी
त्या कार्यवाही साठी
(मा. मंत्री महोदयांच्या निर्देशाने)

खाजगी सचिव
मंत्री, पर्यावरण
यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४००

मा. महोदय,
वरील विषयास अनुसरुन नम्र विनंती की मौजे कुसुंबा ता. जि. धुळे येथे महाराष्ट्र राज्य स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प पुणे अंतर्गत आठवडे बाजार ओटयाचे काम मंजुर करुन निकृष्ट दर्जाचे काम सुरु आहे. सदर काम कुसुंबा हिरासन नाला च्या काठावरच सुरु आहे. काम चालु असलेले क्षेत्र हे हिरासन नाला च्या हद्दीत आहे. त्यामुळे ह्या संबंधीत (पब्लिक) विभागाने पर्यावरण विभागाची नाहरकत अथवा मंजुरी घेणे अनिवार्य आहे. तरी देखील आपल्या पर्यावरण विभागाला विश्वासात न घेता संबंधीत ग्रां पं. कुसुंबा व M.A.C.P चे अधिकारी यांनी संगनमताने गैरव्यवहार करण्याच्या दृष्टीने कामास पुर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न आहे. सदर काम हिरासन नाला क्षेत्रात असल्याने त्या ठिकाणी पुराचा मोठा धोका आहे. त्यामुळे आपल्या पर्यावरण विभागाकडुन तात्काळ कामाला स्थगिती मिळावी आणि शासनाचे लाखो रुपयाचे होणारे नुकसान टाळावे ही विनंती.

C-255

recd on 
२०/०७/१५

आपले विश्वासू
श्री. संग्राम गोविंदराव पाटील
श्री. संजय साहेबराव शिंदे
विद्यमान ग्रां पं. सदस्य
कुसुंबा ता. जि. धुळे

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई – ४०० ०२२.


**क्रमांक : मप्रनि/ सस (तां)/ म-** 420

**दिनांक :** 2/११/१०.२०१५.

**प्रति,**
**संचालक,**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
१५ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२.

विषय : कुसुंबा, ता.जि.धुळे येथील बाजार ओटयास बांधकाम पर्यावरण विभागाची परवानगी न घेतल्याबाबत.....

संदर्भ : मा.मंत्री, पर्यावरण यांच्या कार्यालयाकडून मंडळास प्राप्त झालेली तक्रार क्र.७६६, दि.१७.०६.२०१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, धुळे यांनी दि.१६.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर घटनेबाबत सद्यस्थितीदर्शक अहवाल मुख्यालयास सादर केला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

सदर अहवालानुसार, मौजे कुसुंबा गांवातील नव्याने बांधण्यात आलेल्या बाजार ओटयास केंद्र शासनाची पर्यावरण अनुमती व म.प्र.नि.मंडळाच्या संमतीपत्राची आवश्यकता नाही.

आपल्या माहितीसाठी.

(पुं.कि.मिराशे)
सहा.सचिव (तां.)

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**प्रत माहितीसाठी,**
**स्वीय सहायक,** मा.मंत्री, पर्यावरण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.